(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
**C.I.N. No. U40109MH2005SGC153645**

**जा. क्र. औसंवि/ब/लसीकरण(कोव्हिड-१९)/६५६२** **दिनांक :१८.०३.२०२१**

# परिपत्रक

**विषय :** सांघिक कार्यालयातील प्रकाशगड येथील कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगारांना कोव्हिड-१९ या आजारावरील लसीकरणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

******

कोव्हिड-१९ या आजाराचा दिवसेंदिवस वाढता प्रादुर्भाव पाहता, सांघिक कार्यालयातंर्गत प्रकाशगड, धारावी, प्रकाशगंगा व एच.एस.बी.सी. येथील कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगारांना कार्यालयीन कामकाजासाठी वेगवेगळया ठिकाणाहून प्रवास करुन, कार्यालयामध्ये यावे लागते.

त्यानुषंगाने, महावितरण कंपनीच्या सांघिक कार्यालयातंर्गत प्रकाशगड, धारावी, प्रकाशगंगा व एच.एस.बी.सी. येथील कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगारांना **बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत बी.के.सी. जम्बो फॅसीलिटी ॲण्ड व्हॅक्सीनेशन सेंटर, गेट नं.९, बांद्रा(पूर्व), मुंबई येथे दि.१९.०३.२०२१ ते दि.२९.०३.२०२१ या कालावधीत दुपारी ३:०० ते सांय ६:०० वाजेपर्यंत कोव्हिड-१९ या आजारावरील लस विनामुल्य देण्याकरीताची सुविधा एक विशेष बाब म्हणून देण्यात आलेली आहे.**

तरी, सर्व अधिकारी/ कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगार यांना विनंती करण्यात येते की, आपण उपरोक्त कालावधीत कोव्हिड-१९ लसीकरणाच्या सुविधेचा लाभ घ्यावा. तसेच, कोव्हिड-१९ ची लस घेण्यासाठी जाण्यापूर्वी **औद्योगिक संबंध विभाग, ४ था मजला, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई** या विभागात आपल्या नावाची नोंद करुन, खालील कागदपत्रे सोबत ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपणांस **कोव्हिड-१९** या आजारावरील लस घेण्याकरीता कोणतीही अडचण येणार नाही.

**१. कार्यालयीन ओळखपत्र**
**२. आधार कार्ड**
**३. पॅन कार्ड (कर्मचाऱ्यांकडे असल्यास)**

सबब, सांघिक कार्यालयातंर्गत प्रकाशगड, धारावी, प्रकाशगंगा व एच.एस.बी.सी. येथील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगारांना कोव्हिड-१९ या आजारावरील लसीकरण करुन घेण्याकरीता उपरोक्त वेळ घेण्यात आलेली असून, सर्व कर्मचाऱ्यांनी त्या वेळेतच जावे.

**(ललित गायकवाड)**
**सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत सविनय सादर :
सर्व विभाग प्रमुख, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

- आपणांस विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त अधिकारी, अभियंते व कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कामगारांना निदर्शनास आणून देण्यात यावे व लसीकरण घेण्याबाबतचे स्पष्ट निर्देश आपल्या स्तरावर द्यावेत.